


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com


तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

काजळे ज्वेलर्स
आजचे सोन्याचे भाव

| | |
|---|---|
| 22 कॅरेट हॉलमार्क दागिणे | = 1, 31, 550/- |
| 20 कॅरेट मणी | = 1, 19, 595/- |
| 18 कॅरेट रोज गोल्ड | = 1, 07, 630/- |
| 16 कॅरेट मुरणी | = 95, 675/- |

बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777

वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ७५ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शुक्रवार । २७/०३/२०२६ । पान - ६




# विकृत खरात घुसला कुणा कुणाच्या घरात

## संगमनेर- अकोले तालुक्यातही भक्त आणि बिल्डरांना लावला चुना ?

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भोंदू खरात प्रकरणाचे धक्कादायक पैलू उघडकीस येत असून त्याच्या आर्थिक व्यवहारांचे जाळे राज्यभर पसरल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे.

नाशिक येथील अशोक खरात उर्फ भोंदू खरात याच्या कथित अश्लील कृत्यांमागे मोठ्या आर्थिक व्यवहारांचे जाळे दडले असल्याचे संकेत मिळू लागले असून, या प्रकरणाला आता गंभीर आर्थिक व संघटित गुन्हेगारीचे स्वरूप येत आहे. खरातच्या आर्थिक व्यवहारांचे व जमिनींच्या खरेदी-विक्रीचे संपूर्ण नियोजन पुण्यातील एका चार्टर्ड अकाउंटंटमार्फत होत असल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित सीए गेल्या पाच वर्षांपासून खरातसोबत अत्यंत जवळून काम करत होता. 'ईशान्येश्वर मंदिर ट्रस्ट'वरही त्याने विश्वस्त म्हणून काम पाहिले असून, खरातच्या व्यवहारांतील प्रत्येक पैशाचा हिशोब याच माध्यमातून पूर्ण होत असल्याचे सांगितले जाते. सध्या तो ट्रस्टवर नसला तरी आर्थिक व्यवहारांशी त्याचा संबंध असल्याची चर्चा आहे.

या प्रकरणाचे धागेदोरे आता संगमनेर आणि अकोले तालुक्यांपर्यंत पोहोचले असून, काही स्थानिक व्यक्ती व व्यावसायिक या जाळ्यात अडकल्याचे समोर येत आहे. विशेष म्हणजे संगमनेरमधील दोन मोठ्या कंत्राटदारांचा या प्रकरणाशी संबंध असल्याचे समजते. बदनामीच्या भीतीने संबंधितांनी मौन बाळगले आहे. तसेच एका राजकीय नेत्याच्या

**संगमनेर– अकोले तालुक्यातील स्वत:ला शहाजोग समजणारे, प्रतिष्ठीत समजणारे खरातच्या भ्रष्टाचार व लैंगिक घोटाळा प्रकरणात अडकले असून सबळ पुरावा उपलब्ध झाल्यानंतर ही नावे पोलीस तपास यंत्रणेकडून कळतीलच. परंतू संगमनेर व अकोले शहरातील काही लॅन्ड माफीया, सॅन्ड माफीया, रेशन माफिया सामान्य जनतेला पिळून खरातच्या ऐश महालात कसे पोहचतात, आर्थिक गुंतवणूक करतात, राजकीय ॲडजेस्टमेंट करतात याबाबी जनतेसमोर आल्यानंतर त्यांचे बुरखे टराटर फाडले जातील. या क्षणाची संगमनेर, अकोले तालुक्यातील पिडीत जनता वाट बघत आहे.**

निकटवर्तीय कार्यकर्त्याच्या माध्यमातून काही नागरिकांना खरातपर्यंत पोहोचवून आर्थिक फसवणूक केल्याचेही बोलले जात आहे. ग्रामीण भागातील काही सामान्य नागरिकही खरातच्या जाळ्यात अडकल्याची शक्यता व्यक्त होत आहे.

संगमनेर-अकोले येथील रिअल इस्टेटमधील गुंतवणूक संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. अशोक खरातने आध्यात्मिक क्षेत्रासोबतच रिअल इस्टेटमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केल्याचे उघड होत आहे. संगमनेर शहरालगत त्याची मालमत्ता आढळून आली असून ती त्याच्या मुलीच्या नावावर असल्याची माहिती पुढे आली आहे. विविध ठिकाणी जमिनींचे व्यवहार करून मोठी मालमत्ता उभी केली आहे. दरम्यान, अश्लील व्हिडिओंच्या आधारे आर्थिक ब्लॅकमेलिंग केल्याचे आरोप होत असून त्या माध्यमातून मिळालेल्या पैशांचा वापर नेमका कसा झाला याचा शोध सध्या विशेष तपास पथक करत आहे. या तपासातून अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

प्राथमिक चौकशीतून हे प्रकरण केवळ एका भोंदू बाबाच्या कृत्यांपुरते मर्यादित नसून, त्यामागे बिल्डर, एजंट, काही राजकीय व प्रशासकीय घटकांचा सहभाग असल्याचे समजते. त्यामुळे या प्रकरणाची व्याप्ती अधिक वाढली आहे.

(पान २ वर)

# मुलाकडून बापास मारहाण

## भांडण सोडवणाऱ्याच्या पोटात चाकूने वार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नात्यांचा पाया हादरवणारी आणि समाजातील घसरत चाललेल्या मूल्यांची जाणीव करून देणारी धक्कादायक घटना तालुक्यातील निमगाव पागा येथे बुधवारी सायंकाळी घडली. स्वतःच्या वडिलांवर निर्दयीपणे हात उगारणाऱ्या मुलाला थांबवण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका सज्जन इसमावरच चाकूने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याने परिसरात तीव्र संताप आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, निमगाव पागा येथील इंद्रायणी तांदूळ हाऊस येथे रविंद्र भाऊसाहेब बागडे हा आपल्या वडिलांना बेदम मारहाण करीत होता. 'ज्यांनी जन्म दिला, त्यांच्यावरच हात उगारणे' ही संतापजनक घटना पाहून तेथे उपस्थित असलेले नितीन रावसाहेब कानवडे (वय ४६) यांनी मानवतेच्या भावनेतून पुढे येत हा प्रकार थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र 'तू मध्ये का पडतोस?' असा जाब विचारत संतप्त आरोपीने थेट कानवडे यांच्या पोटात चाकूने वार केला. या अचानक झालेल्या हल्ल्यात कानवडे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला. या प्रकरणी नितीन कानवडे यांनी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या घटनेमुळे समाजातील नातेसंबंधांची घसरलेली पातळी पुन्हा एकदा समोर आली आहे. वडिलांवर हात उगारणारा मुलगा आणि मदतीला धावून आलेल्या व्यक्तीवर प्राणघातक हल्ला-या दुहेरी धक्कादायक प्रकारामुळे 'माणुसकी' आणि 'संस्कार' यांवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. गावात भीतीचे वातावरण असून नागरिकांकडून कठोर कारवाईची मागणी होत आहे. बुधवारी रात्री पोलीसांनी आरोपी रविंद्र बागडे याला ताब्यात घेतले आहे.

# संगमनेरमध्ये रामनवमीचा जल्लोष



**संगमनेर – आज चैत्र शुद्ध नवमी... अधर्मावर धर्माच्या विजयाचे प्रतीक आणि मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामाचा जन्मोत्सव! मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र यांच्या जन्मोत्सवाचा सोहळा आज संपूर्ण महाराष्ट्रात अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात येत आहे. शहरातील विविध राम मंदिरात सकाळपासून भाविकांनी दर्शनासाठी मोठी रांग लावली होती. विविध संघटनांच्यावतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले होते. दरम्यान शहरातील नविन नगर रोड येथील जानकीनगरमधी श्रीराम मंदिरात राम नवमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी संगमनेरच्या नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे, मालपाणी उद्योग समुहाचे संचालक मनिष मालपाणी, नगरसेविका सीमाताई खटाटे, नंदा गरूडकर, रचना मालपाणी, गणेश गुंजाळ यांच्यासह अनेक भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# मंत्री झिरवाळांचा आक्षेपार्ह व्हिडिओ व्हायरल

## विरोधकांकडून राजीनाम्याची मागणी



मुंबई (वृत्तवस्था)

राज्याचे अन्न व औषधी प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ पुन्हा अडचणीत आले आहेत. नरहरी झिरवाळ यांचा कथित आक्षेपार्ह व्हिडीओ समाज माध्यमावर व्हायरल झाला आहे. या व्हिडीओमध्ये झिरवाळ यांच्यासोबत एक तृतीयपंथी व्यक्ती असल्याचा दावा त्या व्यक्तीच्या भावाने पत्रकार परिषद घेत केला. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर राज्यात खळबळ उडाली असून आता पुन्हा एकदा राजकारण तापले आहे. हा संपूर्ण प्रकार मंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी झाला असल्याची माहिती समोर आली आहे. नरहरी झिरवाळ यांच्या या व्हिडिओनंतर विरोधक चांगलेच आक्रमक झाले आहेत. कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळांनी नरहरी झिरवाळ यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. २ महिन्यापूर्वी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लिपिकाला ३५ हजारांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडलं होतं. यावेळी विरोधकांनी राजीनाम्याची मागणी केली होती. मात्र आता पुन्हा एकदा आक्षेपार्ह व्हिडीओमुळे झिरवाळ अडचणीत आलेत. पुन्हा त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. तृतीयपंथी पवन यादव हा मंत्री नरहरी झिरवाळ यांच्यासोबत या आक्षेपार्ह स्थितीत दिसत आहे. पवन यादववर मुंबईतल्या कुरार पोलिस ठाण्यामध्ये खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल आहे.

नरहरी झिरवाळ आणि पवन यादव यांचा आक्षेपार्ह व्हिडीओ सात महिन्यांपूर्वीचा आहे. या व्हिडीओमध्ये शासकीय निवासस्थानी पवन यादव आणि मंत्री नरहरी झिरवाळ हे दोघे बेडवर असून त्यांच्याजवळ दारू आणि खाद्यपदार्थ आहेत. या व्हिडीओने पुन्हा राजकारणात खळबळ उडाली आहे. आता नरहरी झिरवाळ यांच्यावर काय कारवाई केली जात आहे हे पाहणं महत्वाचे राहिल. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर मंगळवारी झिरवाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. नरहरी झिरवाळ हे नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी मतदारसंघाचे राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे आमदार आहेत.


दरम्यान, कॉंग्रसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नरहरी झिरवाळ यांचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. त्यांनी या पोस्टमध्ये लिहिले की, 'राज्याचे मंत्री नरहरी झिरवाळ यांचा आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होणे ही केवळ एक घटना नसून, महाराष्ट्राच्या राजकारणातील नैतिक अध:पतनाचे ज्वलंत उदाहरण आहे. एक जबाबदार लोकप्रतिनिधी, ज्याच्यावर जनतेचा विश्वास आणि करदात्यांच्या पैशांची जबाबदारी आहे, त्याच्याकडून अशा प्रकारचे अश्लील आणि अनैतिक वर्तन होणे अत्यंत संतापजनक आणि निषेधार्ह आहे. हा प्रकार केवळ व्यक्तीगत मर्यादांचा भंग नाही, तर सार्वजनिक जीवनातील नैतिकतेलाच काळिमा फासणारा आहे. (पान २ वर)







# सांगलीचे ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे निधन



सांगली (वृत्तसंस्था)

शिवकालीन आणि मराठा इतिहासाचे गाढे अभ्यासक, ज्येष्ठ संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले. गेल्या दीड महिन्यांपासून त्यांच्यावर फुफ्फुसाच्या संसर्गामुळे उपचार सुरू होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले आणि मुली असा परिवार आहे.

सांगली जिल्ह्यातील 'तडसर' हे डॉ. पवार यांचे मूळ गाव. एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या जयसिंगरावांच्या शिक्षणाची दिशा राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथे बदलली. प्रारंभी अर्थशास्त्र विषयात रस नसतानाही त्यांनी नंतर इतिहासाची वाट धरली आणि शिवाजी विद्यापीठातून एम.ए. परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावला. 'पंचगंगा तिरी' या त्यांच्या आत्मचरित्रातून त्यांचा हा जीवनप्रवास उलगडला आहे.

छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई आणि महाराणी येसूबाई यांच्या जीवनावरील अनेक अज्ञात साधने त्यांनी प्रकाशात आणली. करवीर संस्थापिका महाराणी ताराराणी यांचे चरित्र लेखून त्यांनी त्यांच्या कर्तृत्वाची जगाला ओळख करून दिली. तसेच, दादोजी कोंडदेव यांच्या संदर्भातील त्यांची ऐतिहासिक मांडणी ही संशोधक म्हणून त्यांची विशेष ओळख ठरली. आयुष्यभर शाहू विचारांनी झपाटलेल्या

(पान २ वर)

ज्येष्ठ साहित्यीक जयसिंगराव पवार कार्य परिचय लेख पान नं. ५ वर प्रकाशीत केला आहे

# जिल्ह्यात पेट्रोल - डिझेलचा मुबलक साठा

## तुटवड्याच्या अफवांवर विश्वास ठेवू नका – जिल्हाधिकारी डॉ. आशिया

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- अहिल्यानगर जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व गॅसचा मुबलक साठा उपलब्ध असून वितरण व्यवस्था अत्यंत सुरळीत सुरू आहे. सध्या सोशल मीडिया व व्हॉट्सपवर इंधन तुटवड्याबाबत पसरवल्या जाणाऱ्या बातम्या पूर्णपणे खोट्या व दिशाभूल करणाऱ्या आहेत. नागरिकांनी अशा कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, पॅनिक होऊन पेट्रोल पंपांवर विनाकारण गर्दी करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.



या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आज जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली, पोलीस अधीक्षक व पुरवठा विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांसोबत एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल किंवा गॅसचा तुटवडा असल्याचा खोटा मेसेज किंवा चुकीची माहिती पसरवणे हा कायद्याने दंडनीय अपराध आहे. जे लोक अशी बेकायदेशीर कृत्ये करून नागरिकांमध्ये घबराट निर्माण करत आहेत, त्यांच्याविरुद्ध पोलीस विभागाच्या समन्वयाने थेट गुन्हे दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा सक्त इशारा या बैठकीत प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

प्रशासनाने दिलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार जिल्ह्यातील इंधन साठ्याची वस्तुस्थिती अत्यंत समाधानकारक आहे. पेट्रोलचीजिल्ह्याची दररोजची गरज ३०८ किलोलिटर इतकी असून, सध्या ८४६ किलोलिटर इतका मुबलक साठा उपलब्ध आहे. तसेच, डिझेलची दररोजची गरज ६८९ किलोलिटर असताना, सध्या १४७१ किलोलिटर इतका साठा उपलब्ध आहे.

# शेतकरी न्यायासाठी काँग्रेस रस्त्यावर

## ३० मार्चला सुरतगाव ते तुळजापूर भव्य पदयात्रा

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने एल्गार पुकारला असून शेतकऱ्यांच्या हक्कासाठी 'शेतकरी संघर्ष न्याय यात्रा' काढण्यात येणार आहे. सोमवारी ३० मार्च रोजी धाराशीव जिल्ह्यातील सुरतगाव ते तुळजापूर अशी पदयात्रा निघणार आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली निघणाऱ्या या संघर्ष यात्रेत पक्षाचे ज्येष्ठ नेते, पदाधिकारी, स्थानिक नेते, कार्यकर्ते व शेतकरी सहभागी होणार आहेत. या यात्रेची सुरुवात सोलापूर तुळजापूर महामार्गावरील सुरतगाव येथून सकाळी ८ वाजता होणार असून यात्रेचा समारोप संध्याकाळी ५ वाजता तुळजापूर येथील शारदा मंगल कार्यालयात येथे सभेने होणार आहे.

शेतकरी विरोधी भाजपा सरकारच्या उद्योगपती धार्जिण्या धोरणांमुळे शेतकरी देशोधडीला लागला आहे. देशात सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात होत आहेत, हे दुर्दैवी आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव मिळत नाही. शेतकऱ्यांचे



उत्पन्न दुप्पट करण्याच्या भाजपा सरकारच्या वल्गना हवेतच विरल्या आहेत. भाजपा सरकार एमएसपीचा कायदाही करत नाही. हमीभावापेक्षा कमी भाव देणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या घोषणाही भाजपा सरकारने केल्या पण त्याही कागदावरच राहिल्या आहेत. यात भरीस भर म्हणून मोदी सरकारने अमेरिकेबरोबर व्यापारी करार करून शेतकऱ्याचे कंबरडे मोडले आहे. या करारामुळे भारतातील शेती व शेतकरी उध्वस्थ होणार आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी काँग्रेस संसद, विधिमंडळ व रस्त्यावरही लढत असून, या संघर्ष यात्रेत शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने केले आहे.

## सुनेत्रा पवार यांच्या पत्रामुळे राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्यांमध्ये खळबळ

मुंबई (वृत्तसंस्था)

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाला लिहिलेल्या पत्रामुळे पक्षातील दिग्गज नेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. २८ जानेवारीनंतर झालेला पक्षाचा कुठलाही पत्रव्यवहार वैध धरू नये, अशी विनंती सुनेत्रा पवार यांनी आयोगाकडे केली आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर कुणाकडून आयोगाकडे पत्र गेले असेल, तर ते आता वैध धरू नये, असे सुनेत्रा पवार यांनी आयोगाला कळवले आहे.फेब्रुवारी महिन्यात झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकारिणीची माहिती या पत्राद्वारे सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाला दिली आहेच; शिवाय २८ जानेवारीनंतर झालेला पक्षाचा कुठलाही पत्रव्यवहार वैध धरू नये, असेही त्यांनी सांगितले. त्यामुळे सुनेत्रा पवार यांच्या पत्रामुळे सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांच्या वर्चस्वाला धक्का बसला आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर तटकरे-पटेल यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ताब्यात घ्यायचा होता, असा आरोप रोहित पवार यांनी केला होता. त्यानंतर लगेच आता सुनेत्रा पवार यांनी आयोगाला दिलेल्या पत्रामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील वरिष्ठ नेते तटकरे आणि पटेल यांच्या वर्चस्वाला धक्का बसलाय का? अशी चर्चा सुरू झाली आहे. २८ जानेवारी २०२६ नंतर झालेला पत्रव्यवहार पक्षाकडून झालेला असेल तर तो वैध धरू नये. राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून यापुढे मी जो पत्रव्यवहार करेन तोच वैध धरावा, अशी मागणी सुनेत्रा पवार यांनी केली आहे. सुनेत्रा पवार यांच्या पत्रामुळे तटकरे-पटेल यांच्या वर्चस्वाला सुरुंग लावण्याचं काम करण्यात आल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. मंगळवारी 'देवगिरी' निवासस्थानावर झालेल्या बैठकीला सुनील तटकरे यांना आमंत्रित करण्यात आले नव्हते; त्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्यांनी आयोगाला पत्र पाठवले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकारणात मोठी चर्चा सुरू झाली आहे. यावर अद्याप तटकरे किंवा पटेल यांच्याकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

# ट्रम्पची आक्रमक भाषा, इराणचा ठाम नकार

## युद्धाच्या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांकडून परस्परविरोधी दावे



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

मध्य पूर्वेत अमेरिका-इराणमध्ये सुरु असलेल्या युद्धाला २६ दिवस झाले आहेत. या युद्धाचा ज्वर कमी होण्याऐवजी उलट दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. इराण युद्धासंदर्भात व्हाइट हाऊसच्या सचिव कॅरोलिन लेविट यांनी एक मोठं वक्तव्य केलं आहे. इराण हे युद्ध हरतोय आणि त्यांची ९ हजारपेक्षा जास्त ठिकाणं अमेरिकी हल्ल्यात नष्ट झाली आहेत. तेच अमेरिकी राष्ट्रध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलय की, इराणी नेत्यांना डील करायची आहे. पण ते मोकळेपणाने बोलायला घाबरतायत. आम्ही त्यांना मारुन टाकू ही त्यांच्या मनात भिती आहे. कॅरोलिन लेविट म्हणाल्या की, इराणमध्ये अमेरिकेची कारवाई सुरु आहे. अमेरिकेने आतापर्यंत इराणवर ५ हजार पाऊंडचे बॉम्ब टाकले आहेत. युद्ध कधीपर्यंत चालणार? या प्रश्नावर कॅरोलविना यांनी मिशन पूर्ण व्हायला अजून ४ ते ६ आठवड्यांचा कालावधी लागेल असं म्हटलं आहे.राष्ट्रपती ट्रम्प यांनी इराणला पुन्हा धमकी दिली आहे. इराणने पराभव मान्य केला नाही तर अजून भीषण प्रहार होईल. आम्ही आतापर्यंत ८ युद्ध जिंकली आहेत. लोक अनेकदा हे विसरतात. आम्ही अजून एक युद्ध जिंकतोय. इराण शांतता करार करण्यासाठी आतुर आहे. पण त्यांना हे मान्य करायचं नाहीय. इराणला भिती ही आहे की, अमेरिका संपवून टाकेल. इराणने आम्हाला कमी लेखण्याची चूक करु नये. इराणी नेतृत्वाचा आधीच पराभव झाला आहे असं डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. इराणने मात्र ट्रम्प यांचे हे दावे फेटाळून लावले आहेत. युद्धासाठी आम्ही तयार आहोत असं त्यांनी म्हटलं आहे. त्यांनी सीजफायर आणि ट्रम्प यांच्या चर्चेच्या दाव्यांना फोल ठरवलं.राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प आणि आमच्या सैन्याच्या अंदाजानुसार हे महत्वाचं मिशन पूर्ण करण्यासाठी ४ ते ६ आठवडे लागतील असा आमचा अंदाज होता. २५ दिवस झाले असून जगातील शक्तीशाली सैन्य आपल्या निर्धारिक वेळेपेक्षा पुढे चाललं आहे. इराणच्या सत्तेला आता युद्धातून बाहेर पडायचं आहे. त्यासाठी ते मार्ग शोधतायत. त्यांना कळून चुकलय की ते मार खातायत. अमेरिका आणि मित्र सैन्यावर हल्ला करण्याची त्यांची क्षमता आणि आपल्या क्षेत्राच संरक्षण करण्याची त्यांची क्षमता प्रत्येक तासागणिक कमी होत चालली आहे असं व्हाइट हाऊसच्या अधिकारी कॅरोलिन लेविट म्हणाल्या. ट्रम्प म्हणतोय इराण चर्चा करतोय. इराण हा दावा नाकारतोय. त्यामुळे नेमकं खरं कोण बोलतय हा प्रश्न निर्माण होतो.

## रशियाकडून ६ कोटी बॅरल तेल खरेदी

आखाती देशातील युद्धस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारताने रशियाकडून तब्बल ६ कोटी बॅरल तेलाची खरेदी केली आहे. एप्रिल महिन्यात या तेलाचा पुरवठा होणार आहे. अमेरिका-इस्रायल आणि इराणमध्ये युद्ध सुरू असल्याने होर्मूझच्या सामुद्रधुनीतील जल वाहतूठ ठप्प झाली आहे. त्यामुळे देशाला होणारा तेल पुरवठा आटला आहे. अमेरिकेने रशियन तेल खरेदीसाठी ३० दिवसांची मुभा दिली आहे. एप्रिलच्या पहिल्या पंधरवड्यात ही मुदत संपणार आहे. त्यामुळे भारताने रशियन तेलाची खरेदी वाढविली आहे. मात्र, वाढलेल्या मागणीच्या पार्श्वभूमीवर रशियाने ब्रेंट क्रूडच्या तुलनेत ५ ते १५ डॉलर अधिक आकारण्यास सुरुवात केली आहे. यापूर्वी भारताला सवलतीच्या दरात तेल देण्यात येत होते. केप्लर या तेल बाजार अभ्यासक संस्थेच्या मते चालू महिन्याप्रमाणेच एप्रिलमध्ये रशियन तेल येईल. मात्र, फेब्रुवारीच्या तुलनेत दुप्पटीने रशियन तेल भारतात येईल.

## मंत्री झिरवाळांचा आक्षेपार्ह व्हिडिओ...

पान १ वरून-

जनतेच्या विश्वासावर निवडून आलेल्या मंत्र्याने किमान नैतिकतेची चौकट तरी पाळावी, ही साधी अपेक्षा असते. मात्र, हा व्हिडिओ पाहता त्या अपेक्षांचा पूर्णपणे भंग झाल्याचे स्पष्ट होते. या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्र्यांनी कोणतीही विलंब न लावता नरहरी झिरवाळ यांची मंत्रीपदावरून तात्काळ हकालपट्टी करावी.' अशी मागणी होत आहे.

## सांगलीचे ज्येष्ठ इतिहास संशोधक ...

पान १ वरून - डॉ. पवार यांना त्यांच्या कार्यासाठी २१ हून अधिक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरवण्यात आले. माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील आणि दिवंगत राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्तेही त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला होता. डॉ. पवार यांना दैनिक युवावार्ता परिवार यांच्याकडून भावपूर्ण श्रद्धांजली.

# बिबट्याच्या हल्ल्यात संजय वाळे जखमी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन कार्यालयातील कर्मचारी तथा मंगळापूर येथील रहिवासी संजय माधव वाळे यांच्यावर रात्री बिबट्याने घराजवळ अचानक हल्ला केला. या हल्ल्यात ते जखमी झाले.

मंगळापुर येथील वाळे वस्तीवर रात्री जेवणानंतर रात्री दहाच्या सुमारास घराच्या बाहेर बसलेले असताना संजय वाळे यांच्या घराजवळ बिबट्या आला. त्याला त्यांनी दरडावून हाकलले. मात्र बिबट्याने पुन्हा माघारी येत संजय वाळे यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यामध्ये त्यांच्या हाताला टाके पडले असून इतर ठिकाणी जखमा झाल्या आहेत. आरडा ओरड झाल्यानंतर घरातील सर्व मंडळी बाहेर आली यानंतर बिबट्याने तेथून धूम ठोकली. या घटनेनंतर त्यांना तातडीने घुलेवाडी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. आता त्यांची प्रकृती स्थिर आहे.



या घटनेची माहिती मिळताच यशोधन कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली याचबरोबर मा. महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, रणजितसिंह देशमुख, डॉ. जयश्रीताई थोरात, डॉ. सुजित खिलारी यांनी वाळे यांच्या प्रकृतीची चौकशी केली. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर वन विभागाच्या कर्मचारी श्रीमती कोंढार यांनी दवाखान्यामध्ये येऊन चौकशी केली.

संगमनेर तालुक्यातील अनेक भागांमध्ये बिबट्याचा वावर सातत्याने वाढल्या असून बिबट्यांनी अनेक माणसांवर हल्ले केले आहेत यामध्ये अनेकांचा बळीही गेला आहे. जवळे कडलग येथील बालकाच्या मृत्यूनंतर बिबट्यांबाबत ठोस धोरण घ्यावे याकरता आमदार सत्यजित तांबे व डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर प्रांत कार्यालयावर मोठे आंदोलन करण्यात आले होते. याचबरोबर लोकनेते बाळासाहेब थोरात यांनीही सातत्याने वनमंत्री व महाराष्ट्र शासनाच्या विभागांना बिबट्यांच्या हल्ल्यांबाबत प्रतिबंध करण्याकरता वेळोवेळी सूचना केल्या आहेत.

या हल्ल्यामुळे मंगळापुर परिसरामध्ये भीतीचे वातावरण पसरले असून या बिबट्याला तातडीने जेरबंद करावे. विविध ठिकाणी पिंजरे लावावे, वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी गस्त वाढवावी अशी मागणी मंगळापुर व परिसरातील नागरिकांनी प्रशासन आणि वन विभागाकडे केली आहे.

## प्रशासक सरपंचांना मोठा दणका

मुंबई (वृत्तसंस्था)

मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य यांच्या समितीला प्रशासक म्हणून नेमण्याचे निर्देश सरकारने दिले होते. २० फेब्रुवारी २०२६ रोजी याविषयीची अधिसूचना सरकारने काढली होती. याविरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करण्यात आलेली आहे. त्यावर आज सुनावणी झाली. राज्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायत संदर्भात किशोर रंगनाथ सुतार व इतर यांनी सादर केलेल्या प्रकरणात औरंगाबाद खंडपीठाने सुधारित अंतरिम आदेश दिले. त्यात सरपंचांचे आर्थिक अधिकार गोठवल्याचे समोर आले आहे.ज्या ठिकाणी अद्याप सरपंचांची प्रशासक म्हणून नेमणूक झाली नाही, त्या ठिकाणी पुढील आदेशापर्यंत नेमणूक करता येणार नाही. व ज्या ठिकाणी यापूर्वीच नेमणूक केली आहे त्यांना कोणत्याही स्वरूपाचे महत्त्वाचे आर्थिक निर्णय घेता येणार नाही. केवळ मासिक वेतन तसेच वीज बिल पाण्याचे बिल इतर अत्यावश्यक सुविधांचा खर्च करण्यास परवानगी देण्यात आली आहे. कोणतेही महत्त्वाचे आर्थिक निर्णय घेण्यापासून अथवा का टेंडर इत्यादी बाबत निर्णय घेण्यास मनाई करण्यात आली आहे. पूर्वी २७ फेब्रुवारी रोजी देण्यात आलेले अंतरिम आदेश रद्द करून सरपंचांना पूर्ण अधिकार देण्याची विनंतीही फेटाळली.

## विकृत खरात घुसला कुणा...

पान १ वरून - प्रकरण उघडकीस येत असतानाही संबंधितांमध्ये भीतीचे वातावरण असून अनेक जण पुढे येण्यास टाळाटाळ करत आहेत. मात्र आगामी काळात आणखी नवे खुलासे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संपूर्ण प्रकरणामुळे संगमनेर, अकोलेसह राज्यभरात खळबळ उडाली असून, तथाकथित आध्यात्मिकतेच्या आडून चालणाऱ्या गैरप्रकारांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. डिजिटल माध्यमांमुळे अशा प्रकरणांचा पर्दाफाश होत असल्याने समाजात जागरूकतेची गरज अधोरेखित होत आहे.

# एलपीजी बुकिंग नियमात बदल नाही

## केंद्र सरकारने अफवा फेटाळल्या



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

घरगुती एलपीजी सिलिंडरच्या बुकिंगच्या अंतिम मुदतीत बदल झाल्याबाबत सोशल मीडियावर पसरत असलेले वृत्त केंद्र सरकारने पूर्णपणे फेटाळून लावले आहे. पेट्रोलियम मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, एलपीजी बुकिंगच्या नियमांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. शहरांमध्ये २५ दिवसांत आणि ग्रामीण भागात ४५ दिवसांत एलपीजी सिलिंडर उपलब्ध होतील.

बुधवारी जारी केलेल्या एका निवेदनात, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने म्हटले आहे की, काही बातम्या आणि सोशल मीडियावरील पोस्टमध्ये एलपीजी रिफिल बुकिंगच्या सुधारित अंतिम मुदतीचा दावा केला जात असल्याचे सरकारच्या निदर्शनास आले आहे. यामध्ये प्रधानमंत्री उज्ज्वला योजना कनेक्शनसाठी ४५ दिवस, नॉन-पीएमयुवाय सिंगल-बॉटल कनेक्शनसाठी २५ दिवस आणि नॉन-पीएमयुवाय डबल-बॉटल कनेक्शनसाठी ३५ दिवसांचा समावेश आहे.

मंत्रालयाने म्हटले आहे की, एलपीजी रिफिल बुकिंगची सध्याची अंतिम मुदत कायम राहील. निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, असे कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत. सध्याच्या रिफिल बुकिंगच्या अंतिम मुदतीत कोणताही बदल नाही. सरकारने नागरिकांना अशा दिशाभूल करणाऱ्या माहिती आणि अफवांपासून सावध राहण्याचे आणि त्यावर विश्वास न ठेवण्याचे किंवा त्या पुढे न पसरवण्याचे आवाहन केले आहे. तसेच, अनावश्यक किंवा घाबरून एलपीजी बुकिंग न करण्याचा सल्लाही दिला आहे. मंत्रालयाने असेही आश्वासन दिले आहे की, देशात पुरेसा एलपीजी साठा उपलब्ध आहे आणि तुटवड्याची कोणतीही भीती नाही, त्यामुळे ग्राहकांनी काळजी करण्याची गरज नाही.

# शेतकऱ्यांच्या जमिनी हडपणाऱ्या अधिकाऱ्यांना सक्तीची रजा - मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील सुमारे दीड ते दोन लाख गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी अधिकाराचा गैरवापर करून हडप करणाऱ्या महसूल विभागातील दोषी अधिकाऱ्यांवर अखेर राज्य सरकारने बडगा उगारला आहे. या घोटाळ्यात सामील असलेल्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना १५ दिवसांच्या 'सक्तीच्या रजे' ची शिक्षा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी विधान परिषदेत जाहीर केली. नाशिक विभागीय आयुक्तांचा सविस्तर अहवाल प्राप्त होताच संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असेही महसूल मंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.



आमदार अनिल परब यांनी १८ मार्च २०२६ रोजी लक्षवेधी सूचनेद्वारे हा गंभीर प्रकार सभागृहाच्या निदर्शनास आणला होता. महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी संगनमताने शेतकऱ्यांच्या मालकी हक्कात परस्पर बदल केल्याचा आरोप त्यांनी केला होता.

या प्रकरणांचे अ, ब आणि क अशा तीन गटांत वर्गीकरण केले आहे. 'अ' गटातील १३ प्रकरणे अत्यंत गंभीर स्वरूपाची असून, यात सामील असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना तातडीने सक्तीच्या रजेवर पाठवण्यात येत आहे. नाशिक विभागीय आयुक्तांच्या अहवालानुसार त्यांच्यावर पुढील फौजदारी किंवा प्रशासकीय कारवाई निश्चित होईल.

# महिलांची डिजिटल बदनामी ठरणार गुन्हा; ३ वर्षांच्या कोठडीची तरतूद

मुंबई : सोशल मीडिया किंवा इतर कोणत्याही डिजिटल माध्यमाद्वारे महिलांची बदनामी करणे, अश्लील व्हिडिओ किंवा फोटो प्रसारित करणे आता महागात पडणार आहे. राज्य सरकारने अशा विकृत कृत्यांना थेट 'लैंगिक गुन्ह्यांच्या' श्रेणीत समाविष्ट केले असून, यासाठी तीन वर्षांपर्यंतच्या कारावासाची तरतूद असणारे 'भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२६' बुधवारी विधान परिषदेत एकमताने मंजूर करण्यात आले.

आजच्या डिजिटल युगात व्हॉट्सप, फेसबुक, ई-मेल किंवा इतर सोशल प्लॅटफॉर्मवर महिलांना लक्ष्य करण्याचे प्रमाण वाढले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विधेयकावर बोलताना स्पष्ट केले की, महिलांबाबत आक्षेपार्ह मजकूर पसरवणे किंवा त्यांना डिजिटल माध्यमांतून धमकी देणे हा आता गंभीर गुन्हा मानला जाईल. केंद्र सरकारच्या 'बीएनएस' कायद्यात ज्या त्रुटी होत्या, त्या दूर करण्यासाठी राज्याने या महत्त्वाच्या दुरुस्त्या सुचवल्या आहेत.

या विधेयकातील दुसरा सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे सिड हल्ल्यातील पीडित महिलांची ओळख आता गुप्त ठेवली जाणार आहे. यामुळे पीडितेच्या सामाजिक प्रतिष्ठेचे रक्षण होण्यास मदत होईल. या दुरुस्त्या आता अंतिम मंजुरीसाठी केंद्राकडे पाठवण्यात येणार आहेत.

या चर्चेदरम्यान आमदार हेमंत पाटील यांनी लहान मुले आणि पुरुषांवर होणाऱ्या अत्याचाराचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, महिलांप्रमाणेच लहान मुले आणि पुरुषांवरील अत्याचाराच्या घटनांवर 'पोक्सो' आणि इतर कायद्यांतर्गत तात्काळ कारवाई करण्याची तरतूद आधीच अस्तित्वात आहे.



शिवसेना (ठाकरे गट) आमदार सचिन अहिर यांनी या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी 'विशेष तपास यंत्रणा' नेमण्याची सूचना केली, जेणेकरून अशा प्रकरणांचा निकाल जलद गतीने लागेल. या चर्चेत अनिल परब, प्रविण दरेकर, मनिषा कायंदे यांसह अनेक सदस्यांनी सहभाग नोंदवत या बदलांचे स्वागत केले.












# राज्याच्या काही भागात यलो अलर्ट




मुंबई (वार्ताहर)-

मार्च महिन्याचा शेवटचा आठवडा सुरू असून घामाच्या धारांनी सध्या राज्यभरात नागरिक त्रस्त आहेत. उन्हाचा तडाखा अनेक ठिकाणी बसत असून, नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मात्र, असं असलं तरी काही ठिकाणी हवामानीच टोकाची परिस्थिती जाणवत आहे. याचदरम्यान आता हवामान विभागाने नवा अलर्ट जारी केला आहे. त्यानुसार, राज्यात पुढील काही दिवस पावसाचे असून, काही भागांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दक्षिण कोकणातील सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि कोल्हापूर घाट विभाग, सातारा आणि सातारा घाट विभाग, सांगली, सोलापूर, परभणी, बीड, नांदेड, लातूर आणि धाराशिव, तसेच विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ आदी भागातील तुरळक ठिकाणी मेघगर्जना होऊ शकते. तसेच विजांचा कडकडाट, यासह ताशी ४० ते ५० किलोमीटर वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. अवकाळीचं संकट असल्याने शेतकऱ्यांना पिकांसाठी योग्य ती व्यवस्था करावी लागणार आहे.

राज्यातील अनेक भागात मागील काही दिवसांपासून पावसाची नोंद होत आहे. काही ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यांसह गारपीटही नोंदली गेली. दरम्यान, राज्यातील काही भागांना पुढील तीन ते चार दिवस हवामान विभागाकडून 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. मात्र, असं असलं तरी राज्यातील काही भागांत उष्ण आणि दमट हवामान कायम राहणार असल्याची माहिती समोर आली आहे.

पावसामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्र, दक्षिण कोकणातील तूरळक ठिकाणी पावसाची नोंद झाली. पुढील तीन ते चार दिवस दक्षिण कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

# दिव्यांग बांधवांच्या चेहऱ्यावर समाधान

## डॉ. मैथिली तांबे यांच्या हस्ते ५% राखीव निधीचे वितरण

**संगमनेर**
**(युवावार्ता प्रतिनिधी)–**
संगमनेर नगरपालिकेच्या वतीने सन २०२५-२६ अंतर्गत दिव्यांग बांधवांसाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीचे वितरण संत गाडगेबाबा हॉल, संगमनेर येथे उत्साहात पार पडले. यावेळी नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांनी स्वतः निधीचे वितरण केले. यावेळी अनेक दिव्यांग बांधवांनी आपले अनुभव मांडताना, त्यांच्या दैनंदिन जीवनात मोठा सकारात्मक बदल होणार असल्याचे सांगितले.



रनगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांनी सांगितले की, दिव्यांग बांधवांचा सन्मान आणि स्वावलंबन हा आमच्या कामाचा केंद्रबिंदू आहे. केवळ निधी वितरणावर न थांबता, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संगमनेर नगरपरिषद कटिबद्ध आहे. लवकरच संगमनेरमध्ये अत्याधुनिक सुविधा असलेले 'दिव्यांग कल्याण भवन' उभारण्यात येणार असून, ते दिव्यांगांसाठी प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि विविध योजनांचा लाभ मिळवण्यासाठी केंद्र ठरणार आहे. तसेच, दिव्यांग बांधवांना प्रशासकीय कामासाठी नगरपरिषदेत येताना कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी तळमजल्यावर सर्व सोयींनी युक्त अशी स्वतंत्र सुविधा निर्माण करण्याचे काम अंतिम टप्प्यात असल्याची माहिती त्यांनी दिली. यामुळे दिव्यांगांना शासकीय कामे सुलभपणे पूर्ण करता येणार आहेत.

यामध्ये प्रामुख्याने आमदार सत्यजीत तांबे यांनी दिव्यांगांच्या हक्कासाठी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला, या निधी वितरणासाठी त्यांचे विशेष प्रयत्न लाभदायी ठरले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेरमध्ये दिव्यांग कल्याणाच्या अनेक कामांना गती मिळत आहे. यावेळी कार्यक्रमास दिव्यांग संघटनांचे अध्यक्ष विनायक दाभोळकर, जालिंदर लहामगे, अन्सार सय्यद, उपनगराध्यक्ष नुरूमोहम्मद शेख, माजी प्रशासकीय अधिकारी श्रीनिवास पगडाल तसेच सर्व सभापती, उपसभापती, नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिव्यांगांसाठी महत्त्वाचे निर्णय - ५% राखीव निधीचे थेट वितरण, लवकरच 'दिव्यांग कल्याण भवन' उभारणार, नगरपरिषदेत तळमजल्यावर स्वतंत्र सुविधा केंद्र, दिव्यांगांच्या प्रशासकीय कामांसाठी सुलभ व्यवस्था, स्वावलंबन आणि सन्मानासाठी ठोस पावले, आमदार सत्यजीत तांबे यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा

# पार्थ पवारांना क्लीन चिट देता येणार नाही - अंजली दमानिया

पुण्यातील मुंढवा येथील बहुचर्चित जमीन गैरव्यवहार प्रकरणात 'खारगे समिती'चा अहवाल समोर आल्यानंतर आता राजकीय वातावरण तापू लागले आहे. या अहवालात शीतल तेजवानी आणि दिग्विजय पाटील यांच्यावर ठपका ठेवण्यात आला असतानाच, आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी थेट पार्थ पवार यांच्यावरही कारवाई करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणामुळे पवार कुटुंबातील सदस्य पुन्हा एकदा चौकशीच्या फेऱ्यात अडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

खारगे समितीने आपल्या निरीक्षणांमध्ये 'अमेडिया' कंपनी आणि त्यातील भागीदारांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. अंजली दमानिया यांनी या मुद्द्याकडे लक्ष वेधताना सांगितले की, अहवालात उल्लेख असलेल्या 'इतर भागीदार' या शब्दांत पार्थ पवार यांचा समावेश होतो. शीतल तेजवानी यांनी पार्थ पवार यांना 'नोटराईज्ड पॉवर ऑफ टर्नी' दिल्याचे कागदपत्रांवरून स्पष्ट होत असल्याचा दावा दमानिया यांनी केला आहे. याबाबत त्यांनी यापूर्वीच पत्रकार परिषदेत सविस्तर खुलासा केला होता.

अंजली दमानिया म्हणाल्या की, हे संपूर्ण प्रकरण फौजदारी स्वरूपाचे असल्याचे समितीने आपल्या निरीक्षणात नोंदवले आहे. त्यामुळे खारगे समिती हा अहवाल आता पुढील कार्यवाहीसाठी गृह, उद्योग आणि महसूल विभागाकडे पाठवणार आहे. राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या विभागाची जबाबदारी असल्याने, त्यांनी या अहवालातील मुद्द्यांची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती दमानिया यांनी केली आहे. अंजली दमानिया म्हणाले की, मुंढवा जमीन प्रकरणी कोणीही पार्थ पवारांना क्लीन चीट देऊ शकत नाही. पार्थ पवार ९९ टक्के भागीदार असलेल्या कंपनीचे १ टक्के भागीदार असलेले दिग्विजय पाटील यांच्यावर गुन्हा दाखल होत असेल, तर पार्थ पवारही तितकेच दोषी आहेत.

# एफआरपी थकबाकीमुळे शेतकरी आक्रमक

## महाराष्ट्रातील थकीत कारखान्यांवर कारवाईची मागणी

**अकोले**
**(युवावार्ता प्रतिनिधी)–**
महाराष्ट्रात साखर कारखान्यांनी २०२५-२६च्या चालू हंगामातील सुमारे ६५० कोटी रुपयांची एफ.आर.पी. अद्याप थकीत ठेवल्याने ऊस उत्पादक शेतकरी कमालीचे आक्रमक झाले आहेत. मार्च अखेर पीक कर्जाच्या परतफेडीची मुदत जवळ आली असताना, हातात पैसे नसल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. याप्रकरणी सरकारने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना व्याजासह थकबाकी मिळेल, यासाठी कारवाई करावी, अशी मागणी किसान सभा व ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती करत आहे.

पश्चिम महाराष्ट्रसह मराठवाड्यात ऊस उत्पादक शेतकरी उसाच्या उत्पादनात अग्रेसर आहे. मात्र, यंदा कारखान्यांनी वेळेत बिले न दिल्याने शेतीचे गणित कोलमडले आहे. मार्च महिना संपायला अवघे काही दिवस शिल्लक असताना शेतकऱ्यांचे ६५० कोटी रु. कारखानदारांनी थकवले आहेत.

उसाचे गाळप झाल्यानंतर १४ दिवसांच्या आत एफ.आर.पी.चे पैसे मिळणे बंधनकारक आहे. मात्र, अनेक कारखान्यांनी या नियमाचे उल्लंघन केले आहे. थकबाकीदार कारखान्यांवर साखर आयुक्तांनी तातडीने 'आर.आर.सी.' अंतर्गत कारवाई करून साखर साठा जप्त करावा आणि शेतकऱ्यांचे पैसे वसूल करावेत, किंवा शेतकऱ्यांच्या थकीत ऊस बिलाची जबाबदारी सरकारने घेऊन, याबाबत साखर निर्यात, निर्यात अनुदान, इत्यादी उपाय करून शेतकऱ्यांना उसाचे पैसे मिळतील, यासाठी योग्य हस्तक्षेप करावा, अशी मागणी आम्ही करत आहोत.


केवळ चालू हंगामातीलच नव्हे, तर मागील २०२४-२५ या हंगामातील एफ.आर.पी.ची रक्कमही व्याजासह मिळावी, अशी आग्रही मागणी किसान सभा व ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती करत आहे. येत्या काही दिवसांत थकबाकी न मिळाल्यास कारखान्यांच्या दारात आणि साखर आयुक्त कार्यालयावर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देत आहे.

कोल्हापूर विभागातील काही कारखान्यांनी हंगाम २०२३-२४ मधील ऊस दर देताना २९५० रुपये प्रति टन दिला आहे. परंतु, यावर्षी दिघंची गटातील तालुका आटपाडी येथील जवळपास ७० ते ८० शेतकऱ्यांना केवळ २१०० रुपये दर दिलेला आहे. याबाबत आज साखर सहसंचालक यांच्या निदर्शनास या बाबी आणून दिल्या आहेत. हीच परिस्थिती मराठवाड्यात आहे. त्यामुळे ही कारवाई करावी, अशी मागणी डॉ. अशोक ढवळे, कॉ. जे.पी. गावीत, डॉ. अजित नवले, कॉ. उमेश देशमुख, कॉ. दिपक लिपने, कॉ. सदाशिव साबळे, कॉ. अमोल नाईक, कॉ. अजय बुरांडे, कॉ. उद्धव पौळ, कॉ. कृष्णा सोळंखे, कॉ. शंकर सिडाम, कॉ. भगवान भोजने यांनी केली.

# तेल आयात धोरणात भारताचा संतुलित बदल

भारत आपल्या तेल आयात धोरणात एक संतुलित आणि टप्प्याटप्प्याने होणारा बदल घडवून आणत आहे. या प्रक्रियेचा मुख्य उद्देश रशियन कच्च्या तेलापासून अचानक दूर जाण्याऐवजी विविधीकरण साधणे हा आहे. गेल्या काही वर्षांत सवलतीच्या दरात उपलब्ध असलेल्या रशियन तेलामुळे भारतीय रिफायनऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला होता. त्यामुळे अचानक त्यावर अवलंबित्व कमी केल्यास नफ्यावर परिणाम होण्याची शक्यता असल्याचा इशारा विश्लेषकांनी सातत्याने दिला आहे. आयात खर्च वाढणे आणि महागाई नियंत्रण अधिक कठीण होणे ही त्यामागील प्रमुख कारणे आहेत. भारतातील रिफायनरी संरचना विशिष्ट प्रकारच्या कच्च्या तेलासाठी अनुकूलित असल्याने, वाहतूक आणि विमा खर्चामुळे अंतिम किंमत ठरते, तसेच देशातील डिझेल-केंद्रित मागणी रचना देखील या निर्णयात महत्त्वाची भूमिका बजावते.

दरम्यान, वॉशिंग्टनमधील अलीकडील राजकीय आणि कायदेशीर घडामोडींनी या विषयात अधिक अनिश्चितता निर्माण केली आहे. पूर्वीच्या धोरणांमध्ये भारताच्या तेल खरेदीच्या पद्धतींशी शुल्क सवलती आणि व्यापार सवलती जोडल्या गेल्या होत्या. मात्र, आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक अधिकार कायद्यांतर्गत कार्यकारी अधिकारांवर अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने घातलेल्या मर्यादांमुळे अशा उपाययोजनांच्या टिकाऊपणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. टॅरिफचा वापर पूर्णपणे संपलेला नसला तरी, आता वॉशिंग्टनकडून विद्यमान कायदे आणि चर्चाधारित करारांवर अधिक भर दिला जात आहे. त्यामुळे भारतासह इतर देशांशी होणारे व्यापार वाद अधिक कायदेशीर चौकटीत सोडवले जात आहेत. या पार्श्वभूमीवर ऊर्जा क्षेत्रात वॉशिंग्टनच्या अपेक्षा स्पष्ट झाल्या असल्या तरी भारताची भूमिका बदललेली नाही. भारताने स्पष्टपणे सांगितले आहे की, ऊर्जा खरेदीचे निर्णय हे व्यावसायिक तत्त्वांवर आधारित असतील आणि ऊर्जा सुरक्षा व राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिले जाईल. अमेरिकेतील न्यायालयीन मर्यादांमुळे एकतर्फी दबाव टाकण्याची क्षमता कमी झाली असून, त्यामुळे भारताला आपल्या धोरणात्मक



स्वायत्ततेचा अधिक लाभ मिळत आहे.

भारतीय रिफायनरी संरचना आणि उत्पादनाचे स्वरूप लक्षात घेतल्यास रशियन तेलाचे महत्त्व अधोरेखित होते. 'युराल्स'सारख्या मध्यम-गुणधर्माच्या कच्च्या तेलामुळे भारतीय रिफायनऱ्यांना नफा टिकवून ठेवणे शक्य झाले होते. एका टप्प्यावर भारताच्या एकूण कच्च्या तेल आयातीत सुमारे ४० टक्के हिस्सा रशियन तेलाचा होता. जरी हा वाटा काहीसा कमी झाला असला तरी उत्पादन प्रक्रियेत त्याचे महत्त्व कायम आहे. याउलट अमेरिकेतील डब्ल्यूटीआय लाईटसारखे तेल हलके आणि कमी सल्फरयुक्त आहे. अशा तेलाचा मोठ्या प्रमाणावर वापर केल्यास उत्पादनाचे संतुलन बिघडू शकते. कारण हलक्या तेलामुळे पेट्रोल आणि नॅफ्थाचे उत्पादन वाढते, ज्यांना आशियाई बाजारात तुलनेने कमी किंमत मिळते. त्यामुळे भारतीय रिफायनऱ्यांनी मिश्रित स्रोत धोरण स्वीकारले आहे. जामनगर आणि वडिनारसारख्या अत्याधुनिक प्रकल्पांमध्ये जड तेलाचा वापर अधिक योग्य ठरतो, तर हलके तेल पूरक स्वरूपात वापरले जाते.

मध्यपूर्वेतील देश भारताच्या ऊर्जा सुरक्षेचा प्रमुख आधार राहिले आहेत. सौदी अरेबिया, इराक आणि संयुक्त अरब अमिराती यांच्याकडून मिळणारे मध्यम-गुणधर्माचे तेल भारतीय गरजांशी सुसंगत आहे. कमी वाहतूक अंतर, स्थिर राजनैतिक संबंध आणि दीर्घकालीन करार यामुळे हा पुरवठा अधिक विश्वासार्ह ठरतो. त्यामुळे विविधीकरण म्हणजे मध्यपूर्वेपासून दूर जाणे नसून त्याभोवती संतुलन साधणे आहे. व्हेनेझुएलाचे तेल तांत्रिकदृष्ट्या रशियन तेलाचा पर्याय ठरू शकते. मात्र, वाहतूक खर्च, निर्बंध आणि नियामक अनिश्चितता यामुळे त्याचा वापर मर्यादित राहतो. दीर्घकालीन गुंतवणुकीअभावी पुरवठ्यावरही मर्यादा आहेत. त्यामुळे हा पर्याय पूरक स्वरूपातच अधिक उपयुक्त ठरतो.

दरम्यान, रशियन तेलावर मिळणाऱ्या सवलतींमध्येही घट झाली आहे. पूर्वी प्रति बॅरल २० ते ३० अमेरिकी डॉलर इतक्या सवलती मिळत असताना आता त्या लक्षणीयरीत्या कमी झाल्या आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारातील दर स्थिरावणे, निर्बंधांची कडक अंमलबजावणी आणि वाढते वाहतूक व विमा खर्च यामुळे ही स्थिती निर्माण झाली आहे. काही भारतीय रिफायनऱ्यांनी आधीच स्पॉट खरेदी कमी केली आहे. या सर्व परिस्थितीत भारताने घेतलेली भूमिका स्पष्ट आहे. तेल आयातीत विविधीकरण करायचे, मात्र ते टप्प्याटप्प्याने आणि व्यावसायिक तत्त्वांवर आधारित असावे. अचानक बदल केल्यास अर्थकारणावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे विद्यमान करारांचा सन्मान राखत नवीन करार करताना सावधगिरी बाळगली जात आहे.

पुढील काळात भारतासमोरील खरे आव्हान म्हणजे या संक्रमणाचे व्यवस्थापन होय. रिफायनरी अर्थकारण, देशांतर्गत इंधन दर आणि राजनैतिक संतुलन राखत हे बदल करणे आवश्यक आहे. भारत-अमेरिका ऊर्जा संबंध देखील अधिक संस्थात्मक चौकटीत विकसित होत आहेत. एलएनजी आणि स्वच्छ ऊर्जा क्षेत्रातील सहकार्य हे चर्चाधारित आणि दीर्घकालीन पद्धतीने पुढे जाण्याची शक्यता आहे. शेवटी, भारताची ऊर्जा नीती ही केवळ राजकीय दबावावर आधारित नसून ती बाजारपेठ, तांत्रिक गरजा आणि राष्ट्रीय हित यांचा समतोल साधणारी आहे. विविध पुरवठादारांचे जाळे टिकवून ठेवणे, रिफायनरी लवचिकता वाढवणे आणि साठवण क्षमता मजबूत करणे ही पुढील वाटचाल ठरणार आहे. अशा संतुलित धोरणामुळेच भारताला बदलत्या जागतिक ऊर्जा व्यवस्थेत आपले स्थान अधिक बळकट करता येईल.

# स्पीड ब्रेकरजवळ विक्रेत्यांची गर्दी

## १३२ केव्ही परिसरात अपघाताची शक्यता



**संगमनेर**
**(युवावार्ता प्रतिनिधी)–**
शहरातील १३२ केव्ही परिसरातील महादेव मंदिराजवळ संध्याकाळी पाच ते सहा या वेळेत रस्त्याच्या बाहेरील बाजूस विक्रेते गाड्या लावून उभे राहत असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. या ठिकाणी नेमका स्पीड ब्रेकर असल्यामुळे वाहतूक अचानक मंदावते, तर काही वेळा कॉलेजची मुले वेगाने वाहने चालवत असल्याचेही दिसून येते.

याच मार्गावर चारचाकी वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. त्यामुळे वेग आणि गर्दी यांचा ताळमेळ न बसल्यास गंभीर अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्थानिक नागरिकांनी याबाबत चिंता व्यक्त केली असून, प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देण्याची मागणी केली आहे.

याबाबत संगमनेर नगरपालिकेने पुढाकार घेत सार्वजनिक बांधकाम विभागाला महामार्गावरील अतिक्रमण काढण्याची पत्र दिले होते मात्र त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही परिणामी अपघाताची शक्यता बळावत आहे.

विक्रेत्यांना पर्यायी सुरक्षित जागा उपलब्ध करून दिल्यास ही समस्या सुटू शकते, असे नागरिकांचे मत आहे. अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने योग्य ती उपाययोजना करावी.

## संपादकीय...

### प्रदूषणाविरुद्ध आता निर्णायक लढा गरजेचा

स्वित्झर्लंडमधील आयक्युएअर या संस्थेने नुकताच प्रसिद्ध केलेला जागतिक प्रदूषणाचा अहवाल भारतासाठी गंभीर इशारा देणारा ठरला आहे. या अहवालानुसार भारत हा जगातील सहाव्या क्रमांकाचा सर्वाधिक प्रदूषित देश ठरला असून देशातील प्रमुख महानगरे प्रदूषणाच्या विळख्यात अडकली आहेत. दिल्ली, मुंबई, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यांसारख्या शहरांचा समावेश सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत होणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. विशेष म्हणजे या अहवालात वातावरणातील पीएम-२.५ कणांचे प्रमाण सुरक्षित मर्यादेपेक्षा तब्बल दहापट अधिक असल्याचे स्पष्ट झाले आहे. हे वास्तव केवळ आकडेवारीपुरते मर्यादित नाही, तर ते थेट नागरिकांच्या आरोग्यावर घाला घालणारे आहे. जागतिक आरोग्य संघटना यांनी ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक प्रदूषण असल्यास श्वसनाचे, हृदयाचे आणि रक्ताभिसरणाशी संबंधित आजार वाढण्याची शक्यता अधिक असते. आज देशातील मोठ्या शहरांमध्ये न्यूमोनिया, पक्षाघात, हृदयविकार आणि फुफ्फुसाच्या कर्करोगाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. या सर्व आजारांचे मूळ कारण प्रदूषित हवा असल्याचे अनेक अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. एकीकडे आपण 'स्मार्ट सिटी'चे स्वप्न रंगवत आहोत, अत्याधुनिक पायाभूत सुविधा उभारत आहोत; परंतु दुसरीकडे या शहरांची फुफ्फुसेच निकामी होत चालली आहेत. विकासाच्या नावाखाली होणारी अतिरेकी बांधकामे, वृक्षतोड आणि वाढती औद्योगिक क्रियाकलाप यामुळे शहरांचा श्वास गुदमरू लागला आहे. आज परिस्थिती अशी झाली आहे की शुद्ध हवा ही नैसर्गिक हक्क न राहता विक्रीसाठी उपलब्ध असलेली वस्तू बनली आहे. मुंबई आणि दिल्लीसारख्या शहरांमध्ये सुरू झालेले 'ऑक्सिजन बार' हे याचे ज्वलंत उदाहरण आहे. तासाला शेकडो रुपये मोजून नागरिकांना ऑक्सिजन घ्यावा लागतो, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. प्रदूषण वाढण्यामागील प्रमुख कारणांमध्ये वाहनांची वाढती संख्या हे एक मोठे कारण आहे. पुणे, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक असल्याचे चित्र दिसते. वाहनांमधून निघणारा धूर हा प्रदूषणाचा मुख्य स्रोत ठरत आहे. त्यातच बांधकामातून उडणारी धूळ, कारखान्यांतून बाहेर पडणारे रासायनिक धूर, प्लास्टिक कचऱ्याची अयोग्य विल्हेवाट आणि वाढते तापमान या सर्व घटकांनी मिळून प्रदूषणाचा राक्षस अधिकच बळकट केला आहे. याशिवाय शहरांच्या नियोजनातील त्रुटी देखील प्रदूषण वाढवण्यास कारणीभूत ठरत आहेत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम नसल्याने नागरिकांना खासगी वाहनांचा वापर करावा लागतो. हिरवळीचे क्षेत्र झपाट्याने कमी होत आहे. वृक्षतोडीमुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेणारी नैसर्गिक यंत्रणाच नष्ट होत आहे. परिणामी शहरांमध्ये 'हीट आयलंड इफेक्ट' निर्माण होऊन तापमान वाढते आणि प्रदूषण अधिकच घातक बनते. स्विस संस्थेचा हा अहवाल म्हणजे केवळ एक अभ्यास नसून तो धोक्याची घंटा आहे. या समस्येकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात परिस्थिती अधिक भीषण होऊ शकते. त्यामुळे तातडीने ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. औद्योगिक क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रदूषणकारी घटकांचे प्रमाण कमी करणे गरजेचे आहे. दगड खाणी आणि बांधकाम प्रकल्पांवर कठोर नियंत्रण आणणे आवश्यक आहे. वाहनांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम आणि आकर्षक बनवावी लागेल. आवश्यक असल्यास 'सम-विषम'सारखे कठोर निर्णय घेण्यासही मागेपुढे पाहता कामा नये. युरोपियन देशांनी प्रदूषण नियंत्रणासाठी राबवलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करून त्याची अंमलबजावणी भारतात करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. यासोबतच नागरिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि व्यवस्थापन, प्लास्टिकचा कमी वापर, सौरऊर्जेचा स्वीकार आणि सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर या सवयी अंगीकारणे आवश्यक आहे. वृक्षारोपण केवळ कार्यक्रमापुरते न ठेवता त्या झाडांचे संवर्धन करणेही तितकेच गरजेचे आहे. प्रदूषण ही केवळ सरकारची समस्या नाही, तर ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. शासन, प्रशासन आणि नागरिक यांचे एकत्रित प्रयत्न झाल्यासच या भस्मासुरावर नियंत्रण मिळवता येईल. अन्यथा विकासाच्या नावाखाली आपण स्वतःच आपल्या भविष्यास गुदमरवण्याचा मार्ग स्वीकारत आहोत, हे लक्षात घ्यायला हवे.

## जिल्हा परिषद शाळा धामणगाव आवारी येथील आदित्य तळपाडेची नवोदय साठी निवड



अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

अकोले तालुक्यामध्ये अनेक उपक्रमांनी गाजलेल्या धामणगाव आवारी शाळेत शिक्षण घेत असलेला आदित्य सखाराम तळपाडे याची अहिल्यानगर जिल्हा जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड झाली आहे. आदित्यने अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तम यश मिळवले असून, मागील वर्षी तो मिशन आरंभमध्ये जिल्ह्यात दहावा तर तालुक्यात प्रथम होता.

मंथनतर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत आदित्यने दुसरा क्रमांक मिळवला होता. या यशासाठी वर्गशिक्षक रावसाहेब भोर यांनी विशेष परिश्रम घेतले. आदित्यच्या यशाबद्दल गट विकास अधिकारी अमर माने, गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत, शिक्षण विस्तार अधिकारी जनार्दन भंवरे, केंद्रप्रमुख सुनिल नरसाळे, शाळेचे मुख्याध्यापक सुजाता चासकर, ग्राम विकास अधिकारी सखाराम तळपाडे, आधार फाउंडेशनचे डॉक्टर महादेव अरगडे, बाळासाहेब पिंगळे, सुखदेव इल्हे आदींनी विशेष अभिनंदन केले.

## होर्मुज सामुद्रधुनीत भारताला दिलासा

### इराणकडून भारतीय जहाजांना सुरक्षित मार्ग




()-

मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक तेल पुरवठ्याची जीवनवाहिनी समजली जाणारी होर्मुजची सामुद्रधुनी इराणने शत्रू राष्ट्रांसाठी बंद केली असतानाच, भारतासाठी मात्र आनंदाची बातमी समोर आली आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी गुरुवारी स्पष्ट केले की, भारत हा इराणच्या ५ सर्वात जवळच्या मित्र देशांपैकी एक असून, भारतीय जहाजांना या मार्गावरून सुरक्षित प्रवासाची परवानगी देण्यात आली आहे.

काय आहे इराणची नवी रणनीती? संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी होर्मुजची सामुद्रधुनी खुली करण्याचे आवाहन केल्यानंतर इराणने आपली भूमिका स्पष्ट केली. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, होर्मुजमधून जाताना चीन, रशिया, भारत, इराक आणि पाकिस्तान या देशांच्या जहाजांना कोणताही अडथळा येणार नाही. आमच्या नजरेत हा मार्ग सर्वांसाठी बंद नाही. आम्ही आमच्या मित्रांसाठी मार्ग मोकळा ठेवला आहे, पण शत्रूंना तेलाचा एक थेंबही येथून नेऊ देणार नाही, असं अब्बास अराघची म्हणाले.

तर अमेरिका, इस्त्रायल आणि त्यांच्या मित्र राष्ट्रांशी संबंधित जहाजांना शत्रू मानले जाणार आहे. त्यांच्यासाठी हा मार्ग पूर्णपणे बंद राहील. ज्या देशांनी इराणविरुद्ध कोणत्याही आक्रमक कारवाईत सहभाग घेतलेला नाही, त्यांनाच या मार्गावरून जाण्याची परवानगी असेल. यासाठी इराणच्या नौदलाशी समन्वय साधणे अनिवार्य आहे.

भारताचे मोठे यश आणि 'ऑपरेशन ऊर्जा सुरक्षा' मध्यपूर्वेतील संकटामुळे भारताचे १८ जहाजे होर्मुज सामुद्रधुनीच्या परिसरात अडकून पडले होते. मात्र, भारताच्या यशस्वी कूटनीतीमुळे पेट्रोलियम पदार्थ घेऊन येणारी ४ जहाजे आधीच सुखरूप बाहेर पडली असून, ५ अधिक जहाजे लवकरच भारतात पोहोचतील. या कठीण काळात भारताने आपल्या ऊर्जा सुरक्षेसाठी ऑपरेशन ऊर्जा सुरक्षा सुरू केले आहे. भारतीय नौदलाने अरबी समुद्रात आणि ओमानच्या आखातात ५ हून अधिक आघाडीच्या युद्धनौका तैनात केल्या आहेत. एलपीजी, एलएनजी आणि कच्च्या तेलाचा पुरवठा खंडित होऊ नये, यासाठी भारतीय नौदल कवच बनून भारतीय मालवाहू जहाजांना एस्कॉर्ट करत आहे.

होर्मुज सामुद्रधुनीची महत्त्वाची का? जगातील एकूण तेल पुरवठ्याचा सुमारे २० टक्के हिस्सा याच ३३-३९ किमी रुंद मार्गावरून जातो. आखाती देशांतून तेल निर्यातीसाठी हा एकमेव जलमार्ग आहे, जो पर्शियन आखात आणि ओमानच्या आखाताला जोडतो. इराण-अमेरिका संघर्षामुळे हा मार्ग अंशतः बंद झाल्याने जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी पडझड आणि अस्थिरता पाहायला मिळत आहे.

पाकिस्तानचा उल्लेख 'दलाल' राष्ट्र असा? दरम्यान, बुधवारी नवी दिल्लीत पार पडलेल्या सर्वपक्षीय बैठकीत केंद्र सरकारने मध्य पूर्व संकटावर चर्चा केली. सूत्रांच्या माहितीनुसार, या बैठकीत पाकिस्तानच्या मध्यस्थीच्या भूमिकेवर कडक शब्दांत ताशेरे ओढण्यात आले असून, पाकिस्तानला दलाल राष्ट्र म्हटलं गेल्याचे सांगितले जात आहे.


**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४ | डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत **डायलेसिस सुविधा उपलब्ध**

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५



युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता — वाटचाल तीन दशकांची

**पाहिजेत** अकाऊंटंट | जागा ०२

टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक, अनुभव : ३ वर्षे

आकर्षक पगार व इतर सुविधा

बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com



**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

**सिद्धार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर,** कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,

पेपर डिलिंग कंपनी करिता खालील **जागा भरणे आहे**

- सेल्स एक्झीक्युटिव -१ — एमबीए असल्यास प्राधान्य
- ऑफिस असिस्टंट -१ — कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक
- कार ड्रायव्हर - १ — अनुभव असल्यास प्राधान्य
- घरकाम करणारी महिला- १ — सर्व घरकाम

अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888



**त्वरित पाहिजेत**
द्वारकादास शामकुमार
सेल्समन | कॅशियर | स्टोअर मॅनेजर | फ्लोअर मॅनेजर | हेल्पर | सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ १० ते ७ | १२ ते ९
9511238422



**हेल्पर पाहिजे**
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी ड्रायव्हर बरोबर कामासाठी हेल्पर पाहिजे
पत्ता– मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977



**बंगला भाड्याने पाहिजे**
2500 स्क्वेअर फूट बांधकाम व 4 व्हिलर गाडी पार्किंग सुविधा, बागेसाठी जागा असलेला नवीन नगर रोड, विद्यानगर, जाणता राजा मैदान, मालपाणी हॉस्पिटल परिसरात बंगला भाडे तत्त्वावर त्वरीत पाहिजे
- संपर्क -
9503626111
9272165050



**पाहिजेत**
सेल्समन (महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747



**पाहिजेत**
मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल
नवीन नगर रोड, ताजने मला, संगमनेर
9921245753



**पाहिजेत**
अमुल डेअरी मार्ट कुषी व्हेट दुध यंत्र तयार करणाऱ्या कंपनीसाठी
मार्केटिंग मॅनेजर- ५
ड्रायव्हर- २
टेलिकॉलर (महिला)- ३
हेल्पर - ५
7350628728



**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7972963397



**डेटा एंट्री ऑपरेटर पाहिजे**
पात्रता: संगणक ज्ञान व MS Excel / Google Sheets मध्ये काम करता येणे आवश्यक.
अनुभव असल्यास प्राधान्य.
वेळ: सकाळी 9 ते संध्याकाळी 6
पगार: चर्चेनुसार / अनुभवाप्रमाणे
पत्ता: मे. एन. के. गाडे ऑफिस, पहिला मजला, गाडे बिल्डिंग, आशिर्वाद पतसंस्थेजवळ, शिवाजीनगर, संगमनेर
9822684402



CorelDRAW Ps Ai Id
WE ARE HIRING
JOIN OUR TEAM
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005


**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई–मेल : tahsildarsangamner@gmail.com
क्र. कावी/ जन्म नोंद/५२२/२०२६
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
संगमनेर, दिनांक – २३/०३/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती सुशिलाबाई चिंधु सानप, रा. निमोन, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक ०५/०३/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. निमोन, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे सुशिलाबाई चिंधु सानप, यांचा जन्म मौजे निमोन, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक ०१/०५/१९७० रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी निमोन, यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी निमोन, यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई–मेल : tahsildarsangamner@gmail.com
क्र. कावी/ जन्म नोंद/५१४/२०२६
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
संगमनेर, दिनांक २५/०२/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. गोरक्षनाथ भागाजी घुगे, रा. खळी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक २३/०२/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. खळी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे आजोबा नामे तुकाराम रखमा घुगे यांचा मृत्यू मौजे खळी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक ०४/०७/१९९९ रोजी झाला असून त्यांची मृत्यू नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी खळी, यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी खळी, यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


**पाहिजेत**
मार्केटिंगसाठी कॉम्प्यटर्सची माहिती असलेले मुले पाहिजेत
पोर्णिमा एजन्सी
नगरपालिकेजवळ, सारिका ड्रेसेस समोर, संगमनेर
7588607008
9890636830



**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६








卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐
MALPANI
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित

**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**

रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर

- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण–गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा

नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक

विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!

संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर

श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)



**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०१ — ॲडव्हान्स एक्सेलचे ज्ञान आवश्यक
अकाउंटंट - ०१ — टॅलीचे ज्ञान आवश्यक, किमान ०१ वर्षाचा अनुभव
आकर्षक पगार
बालाजी एअर प्रोडक्ट, संगमनेर
8600828485
9511833320



**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# अल्पवयीन मुलीचा बालविवाह

## सहा जणांविरोधात गुन्हा दाखल

घारगाव (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर तालुक्यातील ग्रामीण भागात बालविवाहासारखी गंभीर आणि कायद्याने दंडनीय घटना उघडकीस आली असून, अवघ्या १४ वर्षीय मुलीचा विवाह केल्याप्रकरणी घारगाव पोलिसांनी सहा जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, बालविवाह प्रतिबंधक यंत्रणेच्या कार्यप्रणालीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, ५ मार्च रोजी दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास हा बालविवाह पार पडला. संबंधित मुलगी केवळ १४ वर्षे २ महिने ५ दिवस वयाची असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. हा विवाह नवरदेवाच्या मामाच्या गावात अतिशय साध्या पद्धतीने लपूनछपून उरकण्यात आला होता. विशेष म्हणजे विवाहानंतर पीडित मुलगी थेट नवरदेवाच्या घरी राहण्यासाठी पाठविण्यात आल्याची धक्कादायक बाबही समोर आली आहे.

या घटनेचा उलगडा अहिल्यानगर येथील स्नेहालय 'उडाण' प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रवीण कदम यांना मिळालेल्या गुप्त माहितीतून झाला. त्यांनी तत्काळ बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यांशी संपर्क साधत कारवाईची मागणी केली. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी अंगणवाडी सेविका व पोलिस पाटील यांच्या मदतीने गावात जाऊन प्रत्यक्ष चौकशी केली असता, बालविवाह झाल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी नवरदेव, त्याचे आई-वडील, अल्पवयीन मुलीचे आई-वडील तसेच नवरदेवाचा मामा अशा एकूण सहा जणांविरोधात घारगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बालविवाह प्रतिबंधक अधिकारी यांच्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली.

बालविवाह हा 'बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६' अंतर्गत गंभीर गुन्हा असून, अशा प्रकारांमुळे मुलींच्या आरोग्य, शिक्षण आणि भवितव्यावर गंभीर परिणाम होतात. तरीही ग्रामीण भागात अशा घटना अद्यापही घडत असल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

या घटनेचा पुढील तपास पोलिस कॉन्स्टेबल दत्तू माधव चौधरी करीत असून, दोषींवर कडक कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच या घटनेच्या निमित्ताने बालविवाहाविरोधात जनजागृती आणि कठोर अंमलबजावणीची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

# लिंगेश्वर यात्रा उत्सवात लाखो भाविकांची उपस्थिती



अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

हिंदू नववर्षाच्या प्रारंभाचा गुढीपाडवा सण लिंगदेव येथे भगवान श्री लिंगेश्वराच्या पारंपरिक यात्रेद्वारे साजरा झाला. अकोले तालुक्यातील मुळा नदीकाठी वसलेल्या या तीर्थक्षेत्रात महाराष्ट्रासह राज्याबाहेरील लाखो भाविकांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला. भगवान लिंगेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली. रात्री १ नंतरही हजारो भाविक दर्शनासाठी रांगेत उभे होते. पारंपरिक संगीत आखाडीने यात्रेची शोभा वाढवली. मुख्याध्यापक

एकनाथ फापाळे यांनी सूत्रसंचालन केले. लिंगेश्वर आदर्श विद्यालय, लिंगेश्वर हायस्कूल, आर. आर. कानवडे ज्युनिअर कॉलेज तसेच प्राथमिक शाळा फापाळेवाडी येथील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. या यात्रेला आ.डॉ. किरण लहामटे उपस्थित होते. यात्रेनिमित्त कुस्ती हगामा पार पडला. रायगड पोलिस आकांक्षा कानवडे यांच्य हस्ते अंतिम कुस्ती लावण्यात आली. अंतिम लढतीत मनोज चव्हाण (पेमगिरी) यांनी विजय मिळवला. त्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

अनिल वाघ (शिवडे) यांना रोख रक्कम देऊन सन्मानित केले. शेलार यांच्याकडून ७,७५१, कै. कारभारी हाडवळे यांचे स्मरणार्थ पोपट हाडवळे यांचेकडून ६१५१ रुपये तर स्व. पोपट कानवडे यांच्या स्मरणार्थ बन्सी कानवडे यांचेकडून ५,५५१ रुपये बक्षीस देण्यात आले. अकोले, संगमनेर व जुन्नर येथील संघांच्या सहभागातून लेझीम स्पर्धा घेण्यात आल्या. महिलांच्या लेझीम पथकाने विशेष आकर्षण ठरले. महाप्रसादाची व्यवस्था डॉ अभिजीत कोरडे यांनी केली.

# पालिकेच्या पत्राला 'साबां' कडून केराची टोपली

## पक्के अतिक्रमणप्रश्नी टाळाटाळ

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

संगमनेर शहरातील नाशिक-पुणे महामार्ग व कोल्हार घोटी रस्त्यावर नगरपालिका हद्दीतील अतिक्रमण समस्येवर तोडगा काढण्यासाठी नगरपरिषदेकडून वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला, मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पालिकेच्या या पत्रांना अक्षरशः केराची टोपली दाखविण्यात आली आहे. परिणामी, अतिक्रमान प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

शहरात दुतर्फा फुटपाथवर काही दुकानदारांनी अतिक्रमण केले आहे. यामुळे वाहतूक समस्या, वाढते अपघात, बेशिस्त फेरीवाले, यासर्वांना शिस्त लावण्यासाठी नगरपालिकेने काही दिवसांपूर्वी अतिक्रमण हटाव मोहीम राबवली. अनेक भागातील अतिक्रमाने काढली, मात्र १३२ केव्हि ते पुणे नाका, प्रवरा नदी पुल, तीनबत्ती चौक, अकोले नाका, कोल्हार घोटी मार्गावर पक्की व राज्य महामार्गअंतर्गत येणाऱ्या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी सार्वजनिक विभागाच्या मदतीची गरज होती. यासाठी पालिकेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी, २७ फेब्रुवारी व १२ मार्च असा दोनदा पत्रव्यवहार केला, मात्र सार्वजनिक बांधकामकडून या पत्रांना प्रतिसाद मिळाला नाही. वाढत्या अतिक्रमणामुळे संगमनेरकरांना दररोज वाहतूक कोंडीसह अपघाताच्या धोक्याला सामोरे जावे लागत आहे.

संगमनेर नगरपालिका हद्दीतील पुणे-नाशिक राज्य महामार्ग व कोल्हार घोटी राज्यमार्ग हे अत्यंत वर्दळीचे मार्ग आहेत. या रस्त्यांच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात दुकानदार, फेरीवाले व काहींनी पक्के बांधकाम करून अतिक्रमण केले आहे. १३२ के. व्ही. सबस्टेशन ते पुणे रोड, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ते प्रवरा नदी पूल, व तीन बत्ती चौक ते अकोले नाका या मार्गावरील परिस्थिती अधिक गंभीर होत आहे.

रस्त्यांच्या हद्दी निश्चित करणे, बाधित मिळकत धारकांची माहिती तयार करणे, नोटिस बजावणे व अतिक्रमण हटविण्यासाठी संयुक्त मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली, मात्र प्रत्यक्षात सार्वजनिक बांधकामच्या हद्दीत येणाऱ्या या दोन प्रमुख रस्त्यांवर संयुक्त कारवाई झाली नाही. सार्वजनिक बांधकामकडून ना पाहणी करण्यात आली, ना हद्द निश्चित करण्यात आली, ना अतिक्रमण धारकांविरुद्ध कार्यवाही करण्यात आली. नगरपरिषद प्रशासनाने पुन्हा संबंधित विभागाने तातडीने जागेवर पाहणी करून कारवाई सुरू करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा, शहरातील नागरिकांच्या वाढत्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा संगमनेर नगरपालिकेने सार्वजनिक बांधकाम विभागाला दिला आहे.

# देवगावमध्ये मोफत कॅन्सर व आरोग्य तपासणी शिबिर



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

शासनाच्या सतर्क अभियानांतर्गत महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती व्हावी आणि कॅन्सरसारख्या गंभीर आजाराचे लवकर निदान होऊन योग्य उपचार मिळावेत, या उद्देशाने देवगाव येथे मोफत कॅन्सर व आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. एकविरा फाउंडेशन, डॉ. जयश्री थोरात यांच्या सहकार्याने इंडियन कॅन्सर सोसायटी, एसएमबीटी हॉस्पिटल घोटी व दंतचिकित्सा विद्यालय, तसेच अल्केम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर पार पडले. या उपक्रमाला प्राथमिक आरोग्य केंद्र देवगाव आणि स्वराज्य महिला ग्रामसंघ यांनी सक्रिय सहकार्य केले. शिबिरात महिलांची सखोल तपासणी करण्यात आली असून, सुमारे १२ हजार रुपयांच्या वैद्यकीय चाचण्या पूर्णपणे मोफत करण्यात आल्या. इंडियन कॅन्सर सोसायटीचे क्षेत्रीय समन्वयक किशोर साळुंके, तसेच एसएमबीटी रुग्णालयाच्या स्त्रीरोग कॅन्सर युनिटच्या डॉ. अश्विनी देशमुख व त्यांच्या टीमने महिलांची तपासणी करून आवश्यक ते मार्गदर्शन केले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. ऋषिकेश अभंग, ओम येवले, प्रकाश कोटकर, आरोग्य सेविका मुंतोडे, रोहिणी कोटकर, संगीता टेमगिरे, आशा सेविका लता रोहम व अर्चना आव्हाड, अनिता शिंदे यांनी परिश्रम घेतले. त्यांनी गावातील प्रत्येक महिलांपर्यंत शिबिराची माहिती पोहोचवून मोठा प्रतिसाद मिळवून दिला. शिबिराच्या यशस्वीतेबद्दल सहभागी डॉक्टर, आरोग्य कर्मचारी व आशा सेविकांचे देवगाव ग्रामस्थांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# संगमनेरात श्रीराम जन्मोत्सव उत्साहात

## साई मंदिरात भजनासह रंगला पाळणा सोहळा

संगमनेर : शहरातील प्रवरा नदीच्या विलोभनीय काठावर वसलेल्या श्रीसाई मंदिरात श्रीराम जन्मोत्सवाचा सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या निमित्ताने आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमांनी मंदिर परिसर रामनामाच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.

सोहळ्याचे औचित्य साधून सकाळी मंदिरात भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. स्थानिक भजनी मंडळाने सादर केलेल्या सुश्राव्य भजनांमुळे भाविकांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले. प्रभू श्रीरामांच्या जीवनावरील अभंग आणि पदांनी वातावरण भक्तिमय झाले होते.




दुपारी १२ वाजता श्रीरामाचा जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी मंदिर परिसरातील आणि शहरातील महिला भाविकांनी एकत्र येत प्रभू श्रीरामाचा पाळणा सजवून, तो आनंदाने हालवला. पारंपारिक पद्धतीने 'कुलोत्पन्न रामाचा पाळणा' गात महिलांनी रामाचा जन्मोत्सव साजरा केला. फुलांनी सजवलेला पाळणा आणि महिलांच्या सुश्राव्य गायनाने हा सोहळा उपस्थित भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा ठरला.

जन्मोत्सव सोहळ्यानंतर मंदिर समितीच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. श्रीसाई मंदिर ट्रस्ट आणि परिसरातील स्वयंसेवकांनी या कार्यक्रमाचे नेटके नियोजन केले होते.

प्रवरा मातेचा काठ आणि साई मंदिराचे पवित्र सानिध्य, यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रीराम जन्मोत्सवाचा आनंद द्विगुणित झाला, अशी भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली. प्रसाद सुतार (शिरसाठ), संगमनेर.

# केकेआरमध्ये वेगवान गोलंदाज नवदीप सैनीची एंट्री

मुंबई (प्रतिनिधी)-

आयपीएल २०२६ पूर्वी कोलकाता नाइट रायडर्स (केकेआर) ने वेगवान गोलंदाज नवदीप सैनीला संघात समाविष्ट केले आहे. तो जखमी हर्षित राणाच्या जागी खेळेल. हर्षित टी-२० विश्वचषकाच्या सराव सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध जखमी झाला होता. तर, भारतीय वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह वर्कलोड व्यवस्थापनासाठी बंगळूरु येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये पोहोचला आहे. येथे तो ताकद आणि कंडिशनिंगवर काम करत आहे. कोलकाता आपला पहिला सामना मुंबईविरुद्ध २९ मे रोजी वानखेडे स्टेडियमवर खेळेल.

# अशोक खरात प्रकरणी प्रामाणिकपणे कारवाई केल्यास डझनभर मंत्री जेलमध्ये जातील - सपकाळ

मुंबई (वार्ताहर)-

भोंदूबाबा अशोक खरातच्या इशानेश्वर मंदिराला देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने २०१८ साली १.५ कोटी रुपयांचा निधी दिला होता. फडणवीसांच्या कार्यालयात त्यावेळी कार्यरत असणारे व आता म्हाडाचे अधिकारी मिलिंद बोरीकर यांचेही या बाबाशी अत्यंत जवळकीचे संबंध आहेत, अशी माहिती मिळत आहे. अशोक खरात प्रकरणात सरकारने प्रामाणिकपणे कारवाई केली तर डझनभर मंत्री आणि दोन डझन अधिकारी जेलमध्ये जातील, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.



काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ एक्स वर केलेल्या पोस्ट मध्ये म्हणतात की, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचेही या भोंदू सोबतचे फोटो समोर आले आहेत. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचेही या भोंदू खरातशी अत्यंत जवळचे संबंध होते, त्यांनीही मुख्यमंत्री होण्यासाठी या बाबाकडून अघोरी पुजा केल्याची माहिती मिळत आहे. भोंदूबाबाचे कारनामे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना सहा महिन्यांपासून माहित होते. पण त्यांच्या आजूबाजूचे लोक, मंत्रीमंडळातील सहकारी यांचे अशोक खरातशी संबंध असल्यानेच माहिती मिळूनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही कारवाई केली नव्हती, पण त्यांच्या मित्रपक्षातील सहका-यांनी देवेंद्र फडणवीस यांचे मुख्यमंत्रीपद घालवण्यासाठी खरातकडून तंत्र मंत्र व अघोरी पूजा केल्यानेच फडणवीसांनी भोंदूबाबा अशोक खरात विरोधात कारवाई केली. भोंदू बाबा अशोक खरातच्या निमित्ताने देवेंद्र फडणवीस आता मित्रपक्ष आणि स्वतःच्या पक्षातील हितशत्रूंना ब्लॅकमेल करत आहेत, असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

# अमृतवाहिनी पॉलिटेक्निक मध्ये अमृतफेस्ट २०२६ अंतर्गत प्रोजेक्ट स्पर्धा

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना उच्च गुणवत्ता पूर्ण शिक्षणाबरोबर संशोधन वृत्तीला प्रोत्साहन देण्याकरता अमृतवाहिनी पॉलिटेक्निक मध्ये अमृतफेस्ट २०२६ प्रोजेक्ट स्पर्धा संपन्न झाली असून, यामध्ये २६१ विद्यार्थ्यांनी आपले नाविन्यपूर्ण प्रोजेक्ट सादर करून प्रभावी कल्पनाशक्तीला चालणा दिली.



अमृतवाहिनी पॉलिटेक्निक मध्ये अहिल्यानगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, पुणे आणि मुंबई जिल्ह्यातील अमृत फेस्ट २०२६ हे प्रोजेक्ट प्रदर्शन झाले. या प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयूदेशमुख, सीईओ अनिल शिंदे, अकॅडमी डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य प्रा. व्ही. बी. धुमाळ, उपप्राचार्य जी. बी. काळे, डॉ. मनोज शिरभाते, डॉ. मच्छिंद्र चव्हाण व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

शरयू देशमुख म्हणाल्या की, येणारा काळ हा संगणकाबरोबरच एआय प्रणालीचा आहे. या नवीन काळाबरोबर विद्यार्थ्यांना नवीन ज्ञानाची माहिती होणे गरजेचे आहे. एआय तंत्रज्ञानाचा इतर विभागांमधून होणारा उपयोग, त्यातून निर्माण होणाऱ्या नवीन संधी याबाबत माहिती घेणे अत्यंत गरजेचे आहे. या प्रोजेक्ट प्रदर्शनामुळे अनेक विद्यार्थ्यांना आपल्या कल्पनाशक्ती मधून संशोधनाला चालना मिळाली असल्याच्या त्या म्हणाल्या. तर डॉ. जे. बी. गुरव म्हणाले की, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे व शरयू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी संस्था ही गुणवत्ता पूर्ण वाटचाल करत आहे.

या प्रदर्शनांमधून मेकॅनिकल, मेक्याट्रॉनिक, सिविल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन, कॉम्प्युटर, आयटी शाखांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेमध्ये ऑटोमेशन, रोबोटिक्स, नवकरणीय ऊर्जा, स्ट्रक्चरल डिझाईन तसेच सॉफ्टवेअर आणि डेव्हलपमेंट यासारख्या विविध आधुनिक तांत्रिक संकल्पना वर आधारित प्रकल्प सादर झाले. विशेषतः आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित प्रकल्पांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. फेस रिकग्रेशन, स्मार्ट सर्विलन्स, व्हाईस कंट्रोल सिस्टीम आणि हेल्थ मॉनिटरिंग यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर विद्यार्थ्यांनी अत्यंत सर्जनशील पणे केला.

या प्रदर्शनामधील उत्कृष्ट प्रकल्प असलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची सखोल ओळखून उद्योग क्षेत्रासाठी सज्ज होण्यास मोठी मदत झाली असल्याचे प्राचार्य प्रा. व्ही. बी. धुमाळ यांनी म्हटले आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांची माजी मंत्री थोरात, डॉ. सुधीर तांबे, शरयू देशमुख, अनिल शिंदे, डॉ. जे. बी. गुरव, प्रा. व्ही. बी. धुमाळ, प्रा. जी. बी. काळे यांचे सर्व विभाग प्रमुखांनी अभिनंदन केले आहे. प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मराठेशाहीचा खरा इतिहास जगासमोर ठेवणारा इतिहास संशोधक साहित्यिक हरपला... श्रद्धांजली

मराठ्यांचा इतिहास हा ज्यांच्या लेखनाचा, अभ्यासाचा विषय होता, सत्य आणि तथ्य शोधून खरा इतिहास जिवंत ठेवण्याची साधना आयुष्यभर करणारे इतिहासकार संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे आज निधन झाले. त्यांच्या निधनाने केवळ एका इतिहास संशोधकाचा अंत झालेला नसून, महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेतील एक महत्त्वाचा दीपस्तंभ काळाच्या पडद्याआड गेला आहे. इतिहास म्हणजे केवळ भूतकाळ नव्हे, तर वर्तमानाला घडवणारी आणि भविष्याला दिशा देणारी शक्ती आहे, हे आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले. मराठेशाहीच्या इतिहासाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन त्यांनी मराठी वाचकांना दिला.

छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचा काळ, मराठेशाहीचे अंतरंग, मराठेशाहीचा इतिहास, शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?, संभाजी महाराज : एक चिकित्सक अभ्यास, राजाराम महाराज आणि स्वराज्य संघर्ष, शिवकालीन महाराष्ट्र, मराठा साम्राज्याची घडण आणि विस्तार, इतिहासातील सत्य आणि गैरसमज, पेशवाईचा इतिहास, दादोजी कोंडदेव कोण होता?, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध ही सरांची उल्लेखनीय ग्रंथसंपदा. राजर्षी शाहू महाराज यांच्या चरित्रासह राज्यकारभार, हुकूमनामे, कायदे, पत्रव्यवहार अशी नऊ पुस्तके सरांनी लिहिली आहेत. सरांच्या लेखनातून, व्याख्यानांतून आणि संशोधनातून असंख्य विद्यार्थ्यांना, अभ्यासकांना आणि इतिहासप्रेमींना दिशा मिळाली.

मागील वर्षी कामानिमित्त पुणे येथील मेहतापब्लिशिंग हाउसमध्ये जाणे झाले.



तेव्हा वर नमूद केलेल्यापैकी सहा पुस्तके खरेदी केली. 'शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?' या पुस्तकाच्या काही प्रती भेट दिल्या. 'मराठ्यांचा इतिहास' हे पुस्तक दिवाळीत बैठक मारून हातावेगळे केले. संशोधन, ऐतिहासिक संदर्भ, लेखन शैली, अशी की पुस्तक बाजूला सारून तुम्ही बसू शकत नाहीत. 'मराठ्यांचा इतिहास', 'संभाजी महाराज एक चिकित्सा' ही पुस्तकं वाचताना सरांचा इतिहास संशोधनाचा आवाका किती मोठा होता, याचा प्रत्यय येतो.

सर आज आपल्यात नाहीत, पण त्यांनी पेटवलेली ज्ञानाची ज्योत पुढील अनेक वर्षे तेवत राहील. पुढल्या पिढ्यांना मार्गदर्शन करत राहील. इतिहासप्रेमींच्या मनात त्यांची उणीव कायम जाणवत राहील. पण त्याचवेळी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याची जबाबदारीही आपली सगळ्यांची आहे. मराठ्यांच्या इतिहासाचा चिकित्सक भाष्यकार असलेल्या सरांचे जाणे वेदनादायी आहे. सरांना भावपूर्ण आदरांजली .

**– भाऊसाहेब चासकर, अकोले**
**मो.नं. ९८८११५२४५५**

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे





नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................. 05
सेल्सगर्ल.................. 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर...................... 03
We are HIRING!
भंडारी
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर


# जोर्वे गावात तरुणाची दहशत

## महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर | कठोर कारवाईची ग्रामस्थांची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील जोर्वे गावात एका तरुणाच्या वाढत्या गैरवर्तनामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून महिला व मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. याबाबत ग्रामस्थांनी उपविभागीय पोलीस अधिकारी, संगमनेर यांना निवेदन देत तातडीने कठोर कारवाईची मागणी केली आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, सार्थक राजेंद्र बलसाने नावाचा तरुण गेल्या काही काळापासून गावात महिलांशी व मुलींशी गैरवर्तन करत आहे. तो शाळेच्या परिसरात उभा राहून येणाऱ्या-जाणाऱ्या मुलींची छेडछाड करणे, अश्लील टिप्पणी करणे असे प्रकार करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच सार्वजनिक ठिकाणी मोठ्या आवाजात टेप रेकॉर्डर लावून अश्लील वर्तन करणे, बाजारपेठेत दादागिरी करणे, नागरिकांना धमकावणे असे प्रकारही वारंवार घडत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या सततच्या त्रासामुळे गावातील महिला, व्यापारी व पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, मुलींना शाळेत पाठवताना पालक साशंक झाले आहेत. संबंधित तरुणाकडून मुलींना धमकावून बदनामी करण्याची तसेच जीव घेण्याची धमकी दिली जात असल्याचाही गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

दरम्यान, अलीकडेच एका अल्पवयीन मुलीसोबत छेडछाड करून ॲसिड हल्ल्याची धमकी दिल्याची घटना घडल्याचे समोर आले असून, या प्रकरणी संबंधितावर पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल झाल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली आहे. तसेच, आरोपीच्या कुटुंबीयांकडूनही त्याला पाठिंबा दिला जात असून, विरोध करणाऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, संबंधित आरोपीला तात्काळ अटक करून त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच पीडित कुटुंबावर दाखल झालेले कथित खोटे गुन्हे मागे घ्यावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.

जोर्वे गावातील वाढत्या या प्रकारांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# दरोडेखोरांच्या टोळीचा पर्दाफाश

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - श्रीरामपूर आणि अकोले पोलिसांच्या पथकाने संयुक्त कारवाई करत अकोले तालुक्यातील धामणगाव पाट येथील दरोडा प्रकरणातील टोळीला जेरबंद करण्यात मोठे यश मिळवले आहे. पोलिसांनी पकडलेल्या या टोळीने नाशिक मधील दिंडोरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ढकांबे येथे केलेल्या गुन्ह्याची कबुली दिली आहे.

सुरेगाव, ता. श्रीगोंदा येथील बाबुशा पिंग्या काळे, शुभम पिंग्या काळे आणि रवि लाला भोसले हे या गुन्ह्यातील आरोपी असल्याचे निष्पन्न झाले असून या टोळीकडून आणखी गुन्हे समोर येण्याची शक्यता श्रीरामपूर विभागाचे अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी वर्तवली आहे. १९ मार्च २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास धामणगाव पाट येथील सुरेखा भोर यांच्या घरी अज्ञात पाच इसमांनी प्रवेश करून घरातील सदस्यांना मारहाण केली होती.



या वेळी आरोपींनी सुरेखा भोर यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र, कानातील सोन्याचे टॉप्स, सासूच्या गळ्यातील सोन्याची पोत आणि सोन्याचे डोरले तसेच एक विवो कंपनीचा मोबाईल असा एकूण १ लाख १० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला होता. या प्रकरणी अकोले पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून आरोपींचा शोध घेण्यासाठी अकोले पोलीस स्टेशन आणि श्रीरामपूर कार्यालयातील विशेष पथकाला आदेश दिले होते. या पथकाने व्यावसायिक कौशल्य आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे गुन्हेगारांचा मागोवा घेतला. या तपासात त्यांना वरील आरोपींनी गुन्हा केल्याचे लक्षात आले. पोलिसांनी तातडीने सापळा रचून या तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

पोलिसांनी या आरोपींची कसून चौकशी केली असता, त्यांनी २३ मार्च २०२६ रोजी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी पोलीस स्टेशनच्या हद्दीत देखील दरोडा घातल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या दरोड्यात त्यांनी कुटुंबीयांना मारहाण करून जखमी केले होते. याबाबत दिंडोरी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल असून पोलीस निरीक्षक भगवान मथुरे या प्रकरणी तपास करत होते. अकोले पोलिसांनी नाशिक पोलिसांशी संपर्क साधून त्या गुन्ह्याची अधिकृत माहिती मिळवली आहे. सध्या हे आरोपी पोलीस कोठडीत असून, त्यांच्याकडून अकोले परिसरातील आणखी काही गुन्हे उघडकीस येतात का, याबाबत पोलीस निरीक्षक मोहन बोरसे अधिक तपास करत आहेत.

# राम मंदिरात भक्तांची मांदीयाळी



संगमनेर – संगमनेर शहरात श्रीराम नवमीनिमित्त शहरातील चंद्रशेखर चौकातील राम मंदीरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. लोकप्रतिनिधी आ. अमोल खताळ व त्यांच्या पत्नी सौ. निलमताई खताळ यांच्या हस्ते विधिवत आरती करण्यात आली. यावेळी उद्योजक राजेश मालपाणी यांच्यासह विविध संस्थांचे, संघटनाचे, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच भाविक उपस्थित होते. राम नवमी निमित्त मंदिरात आकर्षक सजावट करण्यात आली होती.


INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ | * कर्ज व्याजदर कमी | * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)

सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध

- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)

०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ॲपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन
टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर
30% ते 70%
डिस्काउंट सेल
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग
- डायलिसीस विभाग
- हृदयरोग विभाग
- जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25